फाईल क्र. १४४२(१)(२)/२०१९/१३-अ दिनांक : १८ जून, २०१९.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (पूर्व) परीक्षा - २०१९

राज्य कर निरीक्षक पदांसाठीचा निकाल

## घोषणा

(जाहिरात क्रमांक: ०१/२०१९)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (पूर्व) परीक्षा - २०१९ घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेमधून **राज्य कर निरीक्षक** पदासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून राज्य कर निरीक्षक (मुख्य) परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल **दिनांक १८ जून, २०१९** रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत पदाकरिता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या व परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**३.** मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्रमांक १ हा दिनांक २८ जुलै, २०१९ रोजी घेण्यात येईल.

**४.** प्रस्तुत निकालाआधारे राज्य कर निरीक्षक मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीचे शुध्दीपत्रक व दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीचे शुध्दीपत्रक व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित "गट-ब" पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजीचे किंवा तद्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यासंदर्भातील पोचपावती सादर करणे बंधनकारक आहे. तसेच अंतिम नियुक्तीपूर्वी खेळाडू उमेदवारांकडे संबंधित उप संचालक, क्रिडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रिडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल असणे बंधनकारक आहे.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्र. २०५३/२०१४ तसेच जनहित याचिका क्र.१७५/२०१८ प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**७.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पदधतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परिक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्विकारार्ह ठरतील.

ठिकाण : मुंबई

उप सचिव (परीक्षा १)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.